महापालिका आयुक्त यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रः म.आ. एल/9229
दिनांकः 20/99/2018

कार्यालयीन आदेश

विषयः- अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फलेक्स इ.वर कारवाई तसेच गुन्हे दाखल करणेबाबत.

संदर्भः- मा. महापालिका आयुक्त यांनी दि. १९.१०.१८ रोजी बैठकीमध्ये दिलेले आदेश

मे. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालय यांची अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फलेक्स इ.वर कारवाई करणे व संबंधितांवर गुन्हे दाखल करणेकामी जबाबदार तथा अंमलबजावणी अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फलेक्स इ. चे कारवाई बाबत मे.उच्च न्यायालयामध्ये दाखल १५५/११ जनहित याचिकेमध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाची पुणे महानगरपालिकेकडून अंमलबजावणी करीत नसल्याबाबत कन्टेम्ट पिटीशन क्र. २१०/१८ दाखल करण्यात आली आहे व मे.उच्च न्यायालयाने पुणे महानगरपालिकेकडील कार्यवाही बाबत तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

त्याचबरोबर दि. ०५.१०.१८ रोजी रेल्वे हद्दीमधील रेल्वे प्रशासनाकडून जुना बाजार चौक येथे जाहिरात फलकावर कारवाई करतेवेळी झालेल्या अपघाताबाबत मे. उच्च न्यायालयाकडून रेल्वे प्रशासनास देखील नोटीस पाठविली आहे.

पुणे शहर हद्दीमधील अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर इ. चे कारवाई कामी आमचे कार्यालयामध्ये दि. १९.१०.१८ रोजी सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त यांची बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्व महापालिका सहायक आयुक्त यांना पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. क्षेत्रिय कार्यालय हद्दीमध्ये सर्व अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फलेक्स इ.वर तात्काळ कारवाई करून अनधिकृत जाहिरात फलकधारकांवर व त्याचबरोबर बोर्ड, बॅनर इ. वर आयोजक म्हणून प्रदर्शित केलेल्या व्यक्ति/संघटना इ. वर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये महापालिका सहायक आयुक्त यांचे स्वाक्षरीने लेखी फिर्याद देऊन फौजदारी गुन्हे दाखल करावे. मे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड,

बॅनर इत्यांदींवर मालमत्ता विद्रुपीकरण कायदयाअंतर्गत गुन्हे दाखल न करणा-या संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त (नोडल ऑफिसर) यांची नावे मे.उच्च न्यायालयात दाखल असलेल्या कंन्टेम्पट पिटीशन मध्ये मे.न्यायालयात कळविण्यात येतील.

२. सदर गुन्हे दाखल करताना संबंधित पोलीस स्टेशनकडून सहकार्य मिळत नसल्यास ही बाब संबंधित पोलीस उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र. १ ते ४ यांचे निदर्शनास आणून देणेत यावी. तद्नंतरही कार्यवाही न झाल्यास परवाना व आकाशचिन्ह कार्यालयाकडे तसे लेखी कळवावे, परवाना व आकाशचिन्ह विभागाकडून ही बाब मे. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यात येईल.

३. सर्व महापालिका सहायक आयुक्त यांचेकडून त्यांचे कार्यक्षेत्रामधील अनधिकृत जाहिरात फलकांचे कारवाईचेवेळी प्रत्येकी एक कनिष्ठ अभियंता, स्थापत्य यांची नेमणूक करावी.

४. अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर इ. चे कारवाई कामी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडून क्षेत्रिय कार्यालयाकडील मागणीनुसार आवश्यक पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा.

५. अनधिकृत बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, झेंडे इ. चे दैनंदिन कारवाई कामी सेवकवर्ग, यंत्रसामुग्री ची आवश्यकता असल्यास संबंधीत महापालिका सहायक आयुक्त यांनी तशी लेखी मागणी आमचेकडे सादर करावी.

६. ज्याठिकाणी अनधिकृत जाहिरात फलकाचे स्ट्रक्चर धोकादायक अथवा जोखमीचे आहे त्या ठिकाणी आवश्यक यंत्रसामुग्रीचा वापर करून कोणताही अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सर्व महापालिका सहायक आयुक्त यांनी दर पधंरा दिवसांचे त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये एकही अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर इ. नाही असा लेखी प्रमाणपत्र संबंधीत परवाना निरीक्षक यांचेकडून घेऊन परवाना व आकाशचिन्ह विभागाकडे सादर करावे.

८. संबंधीत महापालिका सहायक आयुक्त यांनी परवाना निरीक्षक यांचेकडून एकही अनधिकृत होर्डींग नसल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरही अनधिकृत जाहिरात फलक (होर्डींग) आढळल्यास संबंधीत परवाना निरीक्षक यांचेवर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

तरी उपरोक्त नमुद केल्यानुसार आपले कार्यक्षेत्रात लावण्यात येणा-या अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, फलेक्स इ. वर तात्काळ कारवाई करुन मोठया प्रमाणात गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी व त्याचा लेखी अहवाल परवाना व आकाशचिन्ह विभागाकडे सादर करावा.

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रति,
सर्व महापालिका सहायक आयुक्त
सर्व क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगपालिका

यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना ...

प्रत :
अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
सह महापालिका आयुक्त/उप आयुक्त, परिमंडळ कार्यालय क्र.१ ते ५
पुणे महानगरपालिका

यांजकडे...